E-54411

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

इंद्रभुवन : पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३ ००१.

## जाहिरप्रसिध्दीकरण

सोलापूर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील ( शहर व हद्दवाढ ) महाराष्ट्र महा. अधि. नियम १९४९ चे कलम ३७६ व कलम ४५२ खाली अनुसूची १८ भाग १ ते ४ मधील सर्व व्यवसायांना व कलम ४५३ खालील सुधारित केलेला परवाना पात्र व्यवसायिकांना ( उदा. इले. पॉ. वर वर्क शॉप, पॉवर लुम्स, टायर रिमोल्डिंग, लॉजिंग, पिठाची गिरणी, मिरची कांडप मशीन, पेट्रोल, डिझेल साठा, लुब्रीकेटींग ऑईल साठा व विक्री इत्यादी ) कळविण्यात येते की, नमुद कायद्या अंतर्गत घेतलेल्या आरोग्य परवान्याचे नुतनीकरण ३१ मार्च २०२२ पूर्वी करून घेणे आपणांस बंधनकारक आहे.

शहरातील अनेक व्यवसायिकांनी त्यांचे व्यवसायाचे मनपा कडून रितसर परवाना न घेता व्यवसाय चालवित व अनेक व्यवसायिकांनी त्यांचे परवान्याचे नुतनीकरण करून घेतले नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब गंभीर स्वरूपाची असून नमुद कायद्या अंतर्गत दखल पात्र आहे.

तरी या जाहीरप्रसिध्दीकरणा द्वारे सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ( शहर व हद्दवाढ ) सर्व परवाना पात्र व्यवसायिकांना कळविण्यात येते की,

१) ज्या व्यवसायिकांनी अद्याप त्यांच्या परवान्याचे नुतनीकरण करून घेतले नाही, त्यांनी त्वरीत www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर License Services या टॅब मध्ये ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे विहित परवाना शुल्क भरून सन २०२२-२३ या वर्षा करीताचे परवान्याचे नुतनीकरण करून घ्यावे.

२) महाराष्ट्र शुश्रुषागृहे अधिनियम १९४९ अंतर्गत ज्या नर्सिंग होम, हॉस्पिटल यांनी आपल्या नोंदणी पत्राचे विहित कालावधीकरीता नुतनीकरण उपरोक्त नमुद ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे विहित नोंदणी शुल्क भरून नुतनीकरण करून घ्यावे.

३) ज्या व्यवसायिकांनी नमुद कायद्या अंतर्गत परवाना घेतला आहे. परंतु व्यवसाय बंद केलेला आहे अशा व्यवसायिकांनी व्यवसाय बंद केले बाबत मुळ परवान्यासह माहिती वरील कार्यालयासह ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे व्यवसाय बंद केल्याच्या कागदपत्रासह (उदा. व्यवसाय बंद केल्याचे शॉप ॲक्ट कार्यालय, फॅक्टरी ॲक्ट कार्यालय, लाईट बीलाकरीता महावितरण कार्यालय इ. कळविल्याचे पत्रे) चालू वर्षाची परवाना शुल्क अदा करून अर्ज करणे आवश्यक आहे.

४) पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये मा. शासन अधिसुचनेनुसार प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर, साठा, वितरण, हाताळणी, विक्री व साठवणूक इ. करू नये. तपासणीमध्ये निदर्शनास आल्यास कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल.

५) दि.१२/०१/२०२२ रोजीच्या मा. शासन निर्णयानुसार आपल्या व्यवसायाच्या नावाची पाटी ही मराठी मध्ये असणे बंधनकारक आहे. त्यामुळे व्यवसायिकांनी आपल्या व्यवसायाच्या नावाची पाटी ही दर्शनी भागामध्ये मराठीत ठळक अक्षरात लावणेची दक्षता घ्यावी.

६) वरील नमुद कायद्या अंतर्गत ज्या व्यवसायिकांचे व्यवसाय विना परवाना चालू आहेत अशा व्यवसायिकांनी त्वरीत www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर License Services या टॅब मध्ये ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे अर्ज व परवाना शुल्क भरून व्यवसायाचा परवना काढून घ्यावा.

व्यवसाय विना परवाना अथवा नुतनीकरण न करता चालू असल्याचे निदर्शनास आल्यास अशा व्यवसायिकां विरूध्द नमुद कायद्या अंतर्गत मे. म्यु. पल कोर्ट सोलापूर यांचे न्यायालयात खटले दाखल करणेची कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सहा. आयुक्त
परवाना विभाग
सोलापूर महानगरपालिका

जाक्र.१/प.वि./९५८
परवाना विभाग
दि. ०३/०३/२०२२